बुक-पोस्ट

श्री. / श्रीमती ______________________

______________________

______________________

______________________

अमर हिंद मंडळ
अमरवाडी,
गोखले पथ (उत्तर),
दादर, मुंबई - ४०० ०२८
दूरध्वनी : २४२२ ३५ ८९

फक्त सभासदांसाठी

# अमर हिंद मंडळ, दादर

मुंबई - ४०० ०२८

(स्थापना : १९४७)

(सार्वजनिक विश्वस्त नोंद क्रमांक एफ ४३ (मुंबई)
संस्था विधी नोंद क्रमांक १७८६/२५-६-१९४९)

# द्वैवार्षिक अहवाल

## १ एप्रिल २००१ ते ३१ मार्च २००३

अमरवाडी
गोखले पथ (उत्तर)
दादर, मुंबई - ४०० ०२८
दूरध्वनी : २४२२ ३५ ८९

# अमर हिंद मंडळ, दादर

## १ एप्रिल २००१ ते ३१ मार्च २००३


विश्वस्तः

श्री. दिनकर शं. पाटील श्री. मुकुंद आ. तिवरेकर

श्री. एकनाथ ना. सातम

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | श्री. मधुकर ज. फडके |
| उपाध्यक्ष | : | श्री. रमेश मा. वरळीकर |
| | | श्रीमती उषा श. मेहता |
| कार्याध्यक्ष | : | श्री. चिंतामणी वि. नागले |
| कार्योपाध्यक्ष | : | श्री. अरुण अ. देशपांडे |
| कार्यवाह | : | श्री. उमेश व्यं. शेणॉय |
| स. कार्यवाह | : | श्री. सतीश श. रेडीज |
| कोषाध्यक्ष | : | श्री. श्रीकृष्ण शं. राणे |
| सदस्य | : | श्री. दीपक ना. पडते |
| | | श्री. भास्कर भि. केरकर |
| | | श्री. चारुदत्त शां. थरवल |
| | | श्री. दत्ता अ. सावंत |
| | | श्री. संजय वि. पेडणेकर |
| | | डॉ. स्नेहल मा. बिर्जे |
| | | श्री. प्रफुल्ल दा. पाटील (स्वीकृत) |
| | | श्री. विजय प्र. राणे (स्वीकृत) |
| | | ॲड. विद्या वि. अडसुळे (स्वीकृत) |


# अमर हिंद मंडळ, दादर

मुंबई - ४०० ०२८

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

अमर हिंद मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २५ जानेवारी २००४ रोजी सकाळी १०.०० वा. मंडळाच्या सभागृहात संस्थेच्या उपाध्यक्षाच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

**सभेपुढील कामे :-**

१. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२. वार्षिक अहवाल (सन २००१-२००२ व २००२-२००३ सालचे) मंजूर करणे.
३. हिशेब व ताळेबंद (सन २००१-२००२ व २००२-२००३ सालचे) मंजूर करणे.
४. हिशेब तपासनीस नेमणे व त्यांचे मानधन ठरविणे.
५. सन २००३-२००४ चे अंदाजपत्रक मंजूर करणे.
६ इमारत, वंसत व्याख्यानमाला, क्रीडा विभाग आणि कला विभाग या विविध निधीत रक्कम वर्ग करण्याबाबतचा ठराव मंजूर करणे.
७. मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे येणाऱ्या अन्य विषयांचा विचार करणे.

दि. १५-१२-२००३ कार्यकारी समितीच्या अनुमतीने

उमेश व्यं. शेणॉय

कार्यवाह

सूचना :

१. गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास घटना-नियमानुसार ही सभा त्याचदिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर होईल.
२. सभासदांना हिशेबासंबंधी माहिती हवी असल्यास ती कार्यालयीन वेळेत (सायंकाळी ६ ते ८ पर्यंत) मंगळवार दिनांक २०/१/२००४ पर्यंत मिळेल.
३. ज्या सभासदांना प्रश्न विचारायचे असतील. त्यांनी ते लेखी स्वरुपात मंगळवार दिनांक २०-१-२००४ पर्यंत मंडळाच्या कार्यालयात सायंकाळी ६ ते ८ या दरम्यान (रविवार सोडून) आणून द्यावेत.
४. ज्या सभासदांचे पत्ते बदलले असतील त्यांनी त्यांचे बदललेले पत्ते त्वरित कळवावेत. जे सभासद हयात नसतील अशा सभासदांच्या वारसांनी / संबंधितानी मंडळास तद्संबंधीची माहिती त्वरित कळवावी.

# द्वैवार्षिक अहवाल

## दिनांक १ एप्रिल २००१ ते ३१ मार्च २००३

सन्माननीय सभासद बंधुभगिनींनो,

सादर वन्दे,

मंडळाचा द्वैवार्षिक अहवाल तसेच जमाखर्च आणि ताळेबंद पत्रके आपणाला सादर करताना कार्यकारी समितीस आनंद होत आहे.

या कालावधीत मंडळाची आर्थिक बाजू अतिशय मजबूत झालेली असून क्रीडा, कला, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यात मंडळ सतत अग्रेसर राहून कार्य करीत आहे हे आंपणास विदीत आहेच.

मंडळाच्या बांधकामासाठी कुर्ला चर्चकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्यामुळे कार्यकारी समितीची तीव्र इच्छा असूनही याबाबतीत काहीच करता येणे शक्य झालेले नाही. लोकसभाध्यक्ष मा. श्री. मनोहर जोशीनींहि याबाबत पुढाकार घेऊनहि कुर्ला चर्च कडून योग्य तो प्रतिसाद मिळत नाही हे दुःखाने नमूद करावेसे वाटते. परंतु आम्ही अजूनहि धीर सोडलेला नसून याबाबतीत सतत प्रयत्न चालू आहेत.

मंडळाच्या द्वैवार्षिक अहवाल पुढील प्रमाणे आहे.

आपले नम्र
**उमेश शेणॉय**
कार्यवाह
कार्यकारी समितीच्या वतीने



## दिनांक १ एप्रिल २००१ ते ३१ मार्च २००२

**सभा :** वरील कालावधीमध्ये कार्यकारी समितीच्या एकूण १० सभा झाल्या कार्यकारी समिती व विश्वस्त यांच्या २ संयुक्त सभा झाल्या (सभा उपस्थितीसाठी परिशिष्ट १ पाहा)

**इमारत निधी, कलाविभाग निधीव क्रीडा विभाग निधी**

अहवालकाळात रु. ५०००००/- (रुपये पाच लाख फक्त) रु. २०००००/- (रुपये दोन लाख फक्त) आणि रु. २०००००/- (रुपये दोन लाख फक्त) अनुक्रमे इमारत निधी, कला विभाग निधी आणि क्रीडा विभाग निधी यामध्ये वर्ग करण्यात आले.

**केटरिंग व्यवस्था :** १ जुलै २००१ ते ३१ डिसेंबर २००१ व तदनंतर १ जानेवारी २००२ ते ३० जून २००२ या कालावधीकरिता "विकी केटरर्स आणि डेकोरेटर्स" यांना संपूर्ण केटरिंग व डेकोरेशन यासाठी मुदत वाढ देण्यात आली.

**वसंत व्याख्यानमाला :** मंडळाची ५४ वी वसंतव्याख्यानमाला शनिवार दिनांक २१ एप्रिल २००१ ते सोमवार दिनांक ३० एप्रिल २००१ या दरम्यान मोठया दिमाखांत संपन्न झाली. या व्याख्यानमालेचे उद्घाटन, सन्माननीय प्रा. ना. स. फरांदे सभापती, महाराष्ट्र विधान परिषद यांच्या "शिक्षणक्षेत्रातील वाढती मूल्यहीनता " या ज्वलंत विषयाने झाले तर व्याख्यानमालेचा समारोप ख्यातनाम जेष्ठ आणि श्रेष्ठ संगीतकार सन्माननीय श्री. श्रीनिवास खळे यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसाचे निमित्त साधून त्यांच्या मुलाखतीने तसेच त्यांनी स्वरबद्ध केलेल्या अजरामर गीतांच्या साथीने एक यथोचित कार्यक्रमाने झाला. या कार्यक्रमांत मंडळाच्या वतीने त्यांचा हृदय सत्कार कविवर्य मा. श्री. मंगेश पाडगांवकर यांच्या शुभहस्ते करण्यांत आला. (अधिक माहितीसाठी परिशिष्ट २ पाहा).

**इतर कार्यक्रम :**

- ■ दिनांक ३ जून २००१ रोजी रोटरी क्लब ऑफ मुंबई, शिवाजी पार्क यांच्या सहकार्याने मोतीबिंदू व नेत्रचिकित्सा तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले. त्यास चांगलाच प्रतिसाद लाभला.
- ■ १२ जून २००१ पद्मश्री कै.पु. ल. देशपांडे यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त 'रुपक' निर्मित पु. ल. देशपांडे यांनी लिहिलेल्या गायिलेल्या व स्वरबद्ध केलेल्या मराठी गाण्याचा "मेघमल्हार" हा मनोरंजक कार्यक्रम सादर करण्यात आला या प्रसंगी पु. ल. चे सहकारी श्री. लालजी देसाई प्रसिद्ध समिक्षक श्री. कमलाकर नाडकर्णी आणि न्यु इंडिया ॲशुरन्स कं चे प्रशासकिय प्रमुख श्री. अशोकजी

प्रधान हे उपस्थित होते. या कार्यक्रमास रसिकांनी चांगलीच गर्दी केला होती. या कार्यक्रमास न्यु इंडिया अॅशुरन्स कं. चे आर्थिक सहाय्य लाभले.

■ मंडळाचे माजी कार्यवाह कै. ना. के उर्फ आबा पडते यांच्या स्मरणार्थ राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे आयोजन केले. दि. १३ व १४ ऑक्टोबर २००१ रोजी प्राथमिक फेऱ्या होऊन अंतिम फेऱ्या दि. २७ व २८ ऑक्टोबर २००१ रोजी पार पडल्या. बक्षिस समारंभास नाटय क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्तिमत्व श्री. प्रभाकर पणशीकर आणि न्यु इंडिया अॅशुरन्स कं. चे उपमहाव्यवस्थापक श्री. मिलींद खरात हे उपस्थित होते प्राथमिक फेऱ्यांसाठी परिक्षक म्हणून सर्वश्री अनंत घोगळे, प्रदीप राणे, भालचंद्र झा आणि सौ. शकुंतला नरे या रंगकर्मीने योगदान दिले तर अंतिम फेरीसाठी सर्वश्री रविंद्र खोत, सुधीर भट आणि सौ. नयना आपटे या नाटयक्षेत्रातील नामवंतानी परिक्षक म्हणून काम पाहिले. या नाटयस्पर्धेसाठी न्यु इंडिया अॅशुरन्स कं. ने अर्थसहाय्य दिले. या स्पर्धेत एकूण २९ स्पर्धक संस्थानी भाग घेतला व त्यात पुढील संस्थानी बक्षिसे मिळविली.

प्रथम पारितोषिक : तमाशा ऑफ ह्युमनिटी (दर्शन ग्रुप)

द्वितीय पारितोषिक - अॅश इज बर्निंग (स्पदंन, रोहे)

तृतीय पारितोषिक - गुडबाय (भूमिका, वाशी)

■ २६ जानेवारी २००२ रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त सकाळी ध्वजारोहणाचा कार्यक्रम कॉ. श्रीमती रोझा देशपांडे यांच्या शुभहस्ते पार पाडण्यात आला.

■ दिनांक २४ मार्च २००३ रोजी अमर हिंद मंडळ व एस. एम. जोशी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने माजी केंद्रीय मंत्री मा. श्री. मधु दंडवते यांचे 'गांधी व जयप्रकाश' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

■ महाराष्ट्र राज्य महिला आयोग, सुयोग सावंत क्लासेस, नाबर गुरुजी विद्यालय इत्यादी संस्थाना विनामूल्य / अल्प भाडयात मंडळाचे सभागृह त्यांच्या कार्यक्रमासाठी उपलब्ध करुन दिले.

■ इंडियन असोशिएशन ऑफ हॅडीकॅप या संस्थेला मंडळाच्या वतीने रु. १०००/- ची देणगी देण्यात आली.

■ दरवर्षीप्रमाणे मंडळाचे आजीव सदस्य, खेळाडू, हितचिंतक इत्यादिना दिवाळी शुभचिंतन कार्डे पाठविण्यात आली.

■ भंगाराच्या विक्रीतून रु. १५००/- जमा करण्यात आले.

■ अहवालकाळात सभागृह व प्रसाधनगृह यांचे नुतनीकरण करण्यात आले.



# क्रीडा विभाग

## खो खो

**अ) महिला अजिंक्यपदे :-**

**१) विहंग क्रीडा मंडळ नवी मुंबई - जोड (तीन) जिल्हे स्पर्धा**

**२) गणेश मित्र मंडळ, लालबाग - जोड (तीन) जिल्हा स्पर्धा**

**३) मुंबई शा. शि. मं. ज्युनियर गट जिल्हा स्तरीय स्पर्धा.**

**४) बाल मित्र मंडळ, शिवाजी पार्क (राष्ट्रवादी कॉंग्रेस पुरस्कृत) जिल्हा स्तरीय ज्युनियर स्पर्धा)**

**ब) महिला उपविजेती पदे :-**

१) मातोश्री चषक - अशोकवाडी, दादर शिवसेना शाखा क्र. ६० पुरस्कृत जोड जिल्हा स्पर्धा.

२) विद्यार्थी क्रीडा केंद्र, परळ, जोड जिल्हा स्पर्धा.

३) शिवनेरी क्रीडा मंडळ, दादर (पूर्व) जोड जिल्हा स्पर्धा

४) मुंबई (शहर) जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा, ज्युनियर गट (ब्राम्हण सेवा मंडळ, पुरुस्कृत)

५) श्री स्पोटर्स क्लब (लालबाग) राज्यस्तरीय स्पर्धा.

**क) मुले किशोर गट :-**

मुंबई शा. शि. मंडळ, वडाळा आणि बालमित्र मंडळ, शिवाजी पार्क यांच्या जिल्हा स्तरी स्पर्धेत अनुक्रमे ३ रा व ४ था क्रमांक.

**वैयक्तिक पारितोषिके :-**

पुढील खेळांडूनी विविध स्तरीय भिन्न गटांच्या स्पर्धातून वैयक्तिक उत्कृष्ट खेळाबद्दल पारितोषिके मिळविली - शीतल चोप्रा, प्रीती धुरी, श्वेता कांबळी, कविता धुरी, शुभदा धुरी, विशाखा सुर्वे, विशाखा गव्हाणे, सपना करपे, अमेय गोडकर, निकेश मोहीते, अमित चिखलकर.

**इ) प्रतिनिधीक संघात निवड :-**

**मुंबई शालेय संघ :** कविता धुरी, शुभदा धुरी, अस्मिता मुतालिक, गीता तुळसकर, विशाखा गव्हाणे, रोहन चव्हाण, अमित संत, अनिरुद्ध रेडकर.

**मुंबई शहर संघ :** श्वेता कांबळी, सपना करपे (महिला गट), निलेश सावंत, विशाखा गव्हाणे (ज्युनियर गट), अमेय गोडकर (सब ज्युनियर गट).

**मुंबई विद्यापीठ संघ :** प्रीती धुरी, सपना कर्वे, श्वेता कांबळी, प्रीती धुरी, (अश्वमेध स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू)

**महाराष्ट्र संघ :** श्वेता कांबळी. (राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा / पंजाब व फेडरेशन चषक, इंचलकरंजी)

# कबड्डी

**अ) पुरुष ''ब'' श्रेणी (जिल्हा स्तरीय) अजिंक्यपदे :**

१) न्यु शिवाजी, लोअर परळ स्पर्धा.

२) बळीराम क्रीडा मंडळ, काळाचौकी स्पर्धा

**उपविजयीपदे**

१) मुंबई (शहर) जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा.

२) श्री साई क्रीडा मंडळ, लोअर परळ, स्पर्धा

**ब) ज्युनियर मुली :-**

१) **मुंबई (शहर) जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा** :- अटीतटीच्या झुंजीनंतर टायब्रेकरसाठी दीर्घकाळ चाललेल्या अंतिम सामन्याचा नाणेफेक करुन दिलेल्या निर्णयात मंडळाच्या संघाला उपविजयी पदावर समाधान मानावे लागले.

**क) ४५ किलो वजनी गट मुली :-** मुंबई शा. शि. मंडळ स्पर्धेत अजिंक्यपद

**ड) ४० किलो वजनी गट मुली :-** मुंबई शा. शि. मंडळ स्पर्धेत उपविजयी.

**कबड्डीच्या विविध स्तरीय/ गटांच्या स्पर्धातून वैयक्तिक पारितोषिकाचे मानकरी :** कुणाल यादव, राहुल वडेकर, साईनाथ काळेकर, सचिन बिर्जे, प्रितीश घुडेकर, योगेश पवार, सुनिल निंबाळकर, अलका पारकर, आरती नार्वेकर, शारदा भोगले, तृप्ती भाटकर.

**इ) प्रतिनिधीक संघात निवड :**

**राष्ट्रीय शालेय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड :** कुणाल यादव



**मुंबई ज्युनियर संघात निवड :** आरती नार्वेकर, तृप्ती भाटकर, साईनाथ काळसेकर

**मुंबई महिला संघ :** शारदा भोगले, आरती नार्वेकर

**मुंबई विद्यापीठ संघ :** शारदा भोगले,

**एस.एन.डी.टी. विद्यापीठ संघ :** अलका पारकर, संध्या तोडणकर.

**मुंबई सब ज्युनियर संघ :** मधुरा मोरे, अक्षया खेडेकर

# -: अभिनंदनीय :-

१) मंडळाचे माजी **अध्यक्ष श्री. शंकरराव (बुवा) साळवी** यांना महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेतर्फे **'महाराष्ट्र कबड्डी भुषण'** हा बहुमान प्रदान करण्यात आला.

२) मंडळाचे अजीव सभासद श्री. मनोहर साळवी यांना महाराष्ट्र शासनाचा २०००-०१ सालचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार मिळाला.

३) मंडळाचे उपाध्यक्ष व क्रीडा प्रमुख श्री. रमेश वरळीकर आणि मंडळाचे आजीव सभासद श्री. उदय देशपांडे हे श्री. उदय लाड यांच्यामार्फत दिला जाणाऱ्या यु.आर.एल. फाऊंडशनच्या क्रीडा पुरस्काराचे अनुक्रमे खोखो व मल्लखांब या खेळातील योगदानाबद्दलचे पहिले मानकरी ठरले.

४) विद्यापीठ खेळांडूसाठी पतियाळा राष्ट्रीय क्रीडा प्रतिष्ठान तर्फे मिळणारी राष्ट्रीय शिष्यवृत्ती अहवालकाळात मंडळाचा खो खो खेळांडू-प्रशिक्षक श्री. जतिन टाकळे यास मिळाली.

**दैनंदिन सराव :**

१) कबड्डी - मुले/मुली - श्री. विजय राणे

२) खो खो - मुली - श्री. प्रफुल्ल पाटील

मुले - श्री. रमेश नाटेकर, श्री. जतीन टाकळे

क्रीडाप्रमुख श्री. रमेश वरळीकर आवश्यक तेव्हा खोखोत मार्गदर्शन करतात. संबंधित प्रशिक्षक जेव्हा अनुपस्थित असतात तेव्हा संघातील जेष्ठ खेळाडू सरावाची जबाबदारी पार पाडतात.

# १ एप्रिल २००२ ते ३१ मार्च २००३

**सभा** : या कालावधीमध्ये कार्यकारी समितीच्या एकूण ७ व कार्यकारी समिती आणि विश्वस्त यांच्या एकुण २ संयुक्त सभा झाल्या (सभा उपस्थितीसाठी परिशिष्ट १ पहा)

**केटरिंग** : १ जुलै २००२ ते ३१ डिसेंबर २००२ आणि १ जानेवारी २००३ ते ३० जून २००३ या कालावधीसाठी ''विकी केटरर्स व डेकोरेटर्स '' यांनाच मंडळातील केटरिंग व्यवस्थेसाठी मुक्रर करण्यात आले.

**निधी** : या कालावधीत इमारत निधी मध्ये रु. २०००००/- (रुपये दोन लाख फक्त) ची भर घालण्यात आली.

**वसंत व्याख्यानमाला** : मंडळाची ५५ वी वसंत व्याख्यानमाला दि. २१ एप्रिल २००२ ते २८ एप्रिल २००२ या कालावधीत आयोजित करण्यात आली. व्याख्यानमालेचे उद्घाटन उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नामदार श्री. उल्हासदादा पवार यांच्या ''आजची राजकीय सामाजिक स्थिती व वाढता धर्मांधवाद'' या व्याख्यानाने झाली तर व्याख्यानमालेचा समारोप महाराष्ट्रातील विख्यात हास्यकवींच्या कवितांच्या 'हास्यधारा' या कार्यक्रमाने झाला. या कार्यक्रमाचे संचालन श्री. रामदास फुटाणे यांनी केले. मंडळाचे तहहयात सभासद श्री. उदयदादा लाड यांच्या सौजन्याने हा कार्यक्रम सादर करण्यात आला (अधिक माहिती परिशिष्ट ३ वर पाहा)

**इतर कार्यक्रम** :

- भारतीय जनजीवनाशी निगडीत असणाऱ्या विविध आजारांची आणि त्यावरील उपचारांची माहिती देण्यासाठी मंडळाच्या वतीने रविवार दिनांक १४ एप्रिल २००२ रोजी एका विशेष व्याख्यांचे आयोजन करण्यात आले होते. यात होमियोपथिक तज्ञ डॉ. शिल्पा निफाडकर यांनी 'आरोग्य आचार व उपचार' या विषयांवर तर मधुमेह तज्ञ डॉ. मनिषा तालिम यांनी 'मधुमेह व उपचार' या विषयांवर स्लाईडद्वारे मार्गदर्शन केले.
- मुंबई महानगरपालिकेचे विविध समित्याचे अध्यक्ष (मा. श्री. सदा सरवणकर -स्थायी समिती, मा. श्री. पराग अळवणी -सुधार समिती, मा. श्री. रविंद्र वायकर -शिक्षण समिती, मा. श्री. आशीष चेंबुरकर -बेस्ट समिती) महापौर मा. श्री. महादेव देवळे, विभागीय नगरसेविका मा. सौ. प्रीती देव्हारे व मा. सौ. स्नेहल जाधव यांचा शुक्रवार दिनांक १९ एप्रिल २००२ रोजी मंडळाच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ''मुंबईच्या नागरी समस्या आणि कार्यवाही'' या ज्वलंत विषयावर एक चर्चासत्रहि घेण्यात आले. या चर्चासत्रांत वरील माननीय व्यक्ति व्यतिरिक्त आमदार माजी मंत्री मा. श्री. दिवाकर रावते, रत्नागिरी टाईम्सचे निवासी संपादक श्री. यशवंत पाध्ये, मुंबई तरुण भारतचे ज्येष्ठ संपादक मा. श्री. लक्ष्मणराव जोशी व मुंबई वृत्तपत्र लेखक संघाचे अध्यक्ष मा. श्री. दत्ताराम साळवी यांनीहि मोलाचा सहभाग घेतला.



- भारतीय स्वातंत्र्याचा ५५ वा वर्धापन दिन १५ ऑगस्ट २००२ रोजी प्रसिद्ध लेखक, नाटककार, शिक्षण क्षेत्रांतील प्रभावी व्यक्तिमत्व, चारित्र्य संपन्न समाजसेवक, निष्ठावंत शिक्षक व निरपेक्ष सेवाव्रती कार्यकर्ते मा. श्री. माधव साखरदांडे यांच्या शुभहस्ते ध्वजवंदनाने करण्यात आला.
- दादरच्या गोखले रोड (उत्तर) परिसरातील गेली ४५ वर्षाहून अधिक रुग्णांना वैद्यकीय सेवा देणारे सेवाभावी, मितभाषी व गरीबांचे अतिशय कन्वाळू असे धन्वंतरी डॉ. अरुण वसंतराव जयकर यांच्या कार्याचा यथोचित गौरव दिनांक १० डिसेंबर २००२ रोजी त्यांच्या ७५ वा वाढदिवसाचे निमित्त साधून मंडळाच्या वतीने सत्कार समारंभाच्या माध्यमातून करण्यात आला. या प्रसंगी मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. मधुकर फडके व प्रसिद्ध युरोलॉजिस्ट डॉ. शरद बापट तसेच डॉ. जयकरांचे अनेक चाहते उपस्थित होते.
- क्रिकेटचा 'वर्ल्ड कप' पूर्वसंध्येवर 'वर्ल्ड कप व क्रिकेटमधील मनोरंजक किस्से' या विषयावर एका व्याख्यानाचे दि. ४ फ्रेबुवारी २००३ रोजी आयोजन करण्यात आले होते. यांत भारताचे यशस्वी माजी कर्णधार मा. श्री. अजित वाडेकर, आंतरराष्ट्रीय किर्तीचे क्रिकेट पंच श्री. माधव गोठोस्कर आणि क्रीडा समीक्षक व सव्वसाची लेखर श्री. द्वारकानाथ संझगिरी यांचा सहभाग होता. या कार्यक्रमास क्रीडा शौकिनांची चांगलीच उपस्थिती होती.
- 'मल्टीपल स्क्लेरॉसिस सोसायटी ऑफ इंडिया' यांच्या सहकार्याने मंडळाच्या वतीने 'मल्टीपल स्क्लेरॉसिस (एम.एस.)' रुग्णासाठी एक दिवसांचे शिबीर १६ फेब्रुवारी २००३ रोजी आयोजित करण्यात आले होते. प्रसिद्ध न्युरोसर्जन डॉ. एन.एच. वाडिया तसेच इतर वैद्यकीय शाखातील तज्ञ डॉक्टर यांनी या शिबीरात उपस्थित राहून रुग्णांना मार्गदर्शन केले.
- प्रजासत्ताक दिनांनिमित्त, २६ जानेवारी २००३ रोजी कारगिल, सियाचीन, लेह, लडाख इ. मोहिमेत सहभागी झालेले व महाराष्ट्रातील एन.सी.सी.च्या पाचव्या बटालियनच्या प्रमुखपदी असलेल तरुण सेनाधिकारी 'ले. कर्नल मा. श्री. यशवंत रेणुशे' यांच्या शुभहस्ते ध्वजवंदनाचा कार्यक्रम करण्यात आला.
- मंडळाच्या छपन्नाव्या वर्धापन दिनानिमित्त संध्याकाळी आजीव सदस्य, खेळांडू, कलाकार हितचिंतक इ. चे एक स्नेहसंमेलन प्रतिवर्षाप्रमाणे आयोजित करण्यात आले. याप्रसंगी

संगीत विश्वातील सर्वज्ञस्वर मा. सौ. आशा भोसले यांनी गायिलेल्या मराठी व हिंदी गीतांची रसिली मैफल 'जीवनगाणी' निर्मित 'स्वराशा' हा कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमाचे निवेदन प्रसिद्ध निवेदिका सौ. उत्तरा मोने यांनी केले.

## संकीर्ण :

- मंडळाच्या एक खेळाडू श्री. योगेश पवार यांना जबर दुखापतवर औषधोपचारासाठी रु. १०,०००/- ची मदत देण्यात आली.
- अखिल भारतीय किर्तन संस्था यांच्या आधिपत्याखाली 'भारतीय नववर्ष स्वागत समिती' याच्या वतीने साजरा केल्या जाणाऱ्या गुढीपाडवा- सामाजिक उत्सव या कार्यक्रमासाठी मंडळाच्या वतीने रु. १०००/- ची देणगी देण्यात आली.
- नाबर गुरूजी विद्यालय, दादर डिस्नेलँड नर्सरी स्कूल (माहिम) पाठारे होलिको'त्सव फंड' फलश्रुति, यंग भारत सेवा मंडळ तसेच महिला हक्क परिषदेस कै. मा. प्रमिला दंडवते यांच्या प्रथम स्मृतीदिनाच्या कार्यक्रमासाठी मंडळाच्या वतीने विनामूल्य / अतिअल्प भाडे आकारुन सभागृह / मैदान उपलब्ध करुन देण्यात आले.
- दोन पहारेकऱ्याची अहवालकाळात नेमणूक करण्यात आली.

## अभिनंदनीय

- मंडळाचे माजी सहकार्यवाह व आजीव सदस्य श्री. अनंत भालेकर यांना त्यांच्या सामाजिक कार्यासाठी 'क्षत्रिय मराठा हितवर्धक मंडळ' यांच्यावतीने 'मराठा गौरव पुरस्कार' देवून सन्मान करण्यात आला.
- मंडळाचे कार्यवाह श्री. उमेश शेणॉय यांना त्यांच्या ऑलिंपिक मधील प्रशंसनीय यशाबद्दल तसेच त्यांच्या क्रीडाक्षेत्रातील कार्याबद्दल 'इन मुंबई' या वाहिनीतर्फे 'साल्युट मुंबई' या कार्यक्रमांतर्गत जाहीर सत्कार करण्यात आला.
- ४२ व्या महाराष्ट्र राज्य मराठी नागरी नाटयस्पर्धेत मंडळाने 'कायदे पंडित' हे नाटक सादर केले या नाटकांचे लेखक श्री. दीपक मंत्री यांना उत्कृष्ट लेखनाचे पांचवे पारितोषिक मिळाले.

**मंडळाचे माजी कार्याध्यक्ष व खो खो खेळांतील राष्ट्रीय कीर्तीचे खेळाडू, पंच, शिक्षक आणि राज्य निवड समिती सदस्य तसेच क्रीडा स्पर्धांचे संघटक मा. श्री. श्रीधर काशिनाथ भोसले यांचे दिनांक १५ डिसेंबर २००२ रोजी निधन झाले. मंडळाच्या वतीने त्यांना साश्रुपूर्ण श्रद्धांजली.**



# कलाविभाग - एकांकिका स्पर्धेचा अहवाल

प्रतीवर्षाप्रमाणे या वर्षी देखील अमर हिंद मंडळाने कै. आबा पडते राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे आयोजन केले. १ जानेवारी २००१ नंतर परिनिरीक्षीत (सेन्सॉर) झालेल्या एकांकिकांनाच प्रवेश देण्यात आल्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी स्पर्धक संस्थांची संख्या घटली, परंतु सादर झालेल्या एकांकिका नविन असल्यामुळे पंचवीस स्पर्धक संस्थानी सहभाग नोंदवून स्पर्धेत चुरस आणली. स्पर्धेची प्राथमिक फेरी दि. १२, १३ ऑक्टोबर २००२ रोजी माननीय परीक्षक डॉ. सौ. राधिका पिंपळस्कर, श्री. राजीव जोशी, श्री. सुरेश चिखले यांच्या उपस्थितीत पूर्ण दिवस घेण्यात आली. दोन्ही दिवसांची उपस्थिती लक्षात घेता सहाशे व सातशे कलाकार, तंत्रज्ञ, रसिक प्रेक्षक येऊन गेले. या प्राथमिक फेरीतून सहा एकांकिकांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली. तसेच या फेरीत कलाकारांना अभिनयाचे उत्तेजनार्थ बक्षीस व तीन लेखकांना लेखनाचे उत्तेजनार्थ बक्षीस जाहिर करण्यात आले. स्पर्धेची अंतिम फेरी दि. २६,२७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.३० वाजल्यापासून पुढे घेण्यात आली. मान्यवर परीक्षक सौ. इला भाटे, श्री. जयंत पवार, श्री. कुमार सोहोनी यांनी अंतिम निर्णय जाहीर केला. प्रख्यात अभिनेते श्री. विजय गोखले यांचे हस्ते दि. २७ ऑक्टोबर २००२ रोजी रात्रौ ९.०० वाजता पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला.

मार्गदर्शनपर भाषणात प्रमुख पाहुणे श्री. विजय गोखले म्हणाले, ५६ वर्षे अखंडपणे वसंत व्याख्यानमाला आयोजित करणाऱ्या या संस्थेविषयी मला नितांत आदर आहे. अमर हिंद मंडळाची परंपरा थोर आहे या व्यासपीठावर अनेक हिमालयासम उत्तुंग व्यक्तिमत्वे येऊन गेली आहेत, ज्ञानदान करुन गेली आहेत अशा व्यासपीठावर प्रमुख पाहुणा म्हणून उपस्थित राहणं मी माझे भाग्य समजतो. स्पर्धकांना सल्ला देताना ते म्हणाले, ह्या व्यवसायाचं काही खरं नाही, आधी पोटापाण्याचा बंदोबस्त करा आणि मगच ह्या व्यवसायात रमण्याची स्वप्न बघा. कोणत्याही वादग्रस्त नाटक सिनेमा मालिकेत काम करु नकां. स्पर्धा संयोजक म्हणून निवेदन करताना दत्ता सावंत यांनी म्हटले, 'अमर हिंद मंडळ' ही समाजसेवी संस्था आहे इथे अनेक उपक्रम वर्षभर सुरु असतात आणि ते प्रेक्षकांसाठी विनामुल्य असतात आपण वर्तमान पत्राकडे लक्ष ठेवा आणि वेळोवेळी कार्यक्रमांना उपस्थितीती दाखवा. शासनाच्या किंवा इतर कोणत्याही अनुदाना शिवाय असे लोकोपयोगी कार्य करणारी ही संस्था आपल्या सारख्या रसिकांची भुकेली आहे.

**<u>प्रथम पारितोषिक</u> : (रोख रु. ५०००/- + प्रशस्तीपत्रक + स्मृतीचिन्ह)**
संकल्प आर्टस् - किर्रऽऽ किर्र

**<u>द्वितीय पारितोषिक</u> : (रोख रु. ३०००/- + प्रशस्तीपत्रक + स्मृतीचिन्ह )**
बहि:शाल - संभवामि युगे युगे

तृतीय पारितोषिक : (रोख रु. २०००/- + प्रशस्तीपत्रक + स्मृतीचिन्ह)
शिधावाटप कर्मचारी संघटना - मृगजळ

**सर्वोत्कृष्ट अभिनय : (रोख रु. २५०/- + प्रशस्ती-पत्रक)**
१) राहुल पवार - किर्रर्र किर्रर्र
२) प्रमोद कदम - किर्रर्र किर्रर्र
३) जयंत पांचाळ - संभवामि युगे युगे
४) वैभव निनाते - संभवामि युगे युगे
५) वर्षा चिखले - मृगजळ

**सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक-प्रथम : (रोख रु. ३००/- + प्रशस्तीपत्रक)**
कय्युम काझी - किर्रर्र किर्रर्र

**सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक-द्वितीय : (रोख रु. २००/- + प्रशस्तीपत्रक)**
जयंत पांचाळ - संभवामि युगे युगे

**सर्वोत्कृष्ट लेखन : रोख रु. ३००/- + प्रशस्तीपत्रक**
रुपेश कदम - किर्रर्र किर्रर्र

**सर्वोत्कृष्ट प्रकाश योजना : (रोख रु. २५०/- + प्रशस्तीपत्रक)**
नरेश पटेल - इम्प्रोवायझेश्‍न

**सर्वोत्कृष्ट नेपथ्य : (रोख रु. २५०/- + प्रशस्तीपत्रक)**
योग्य स्पर्धक न आढळल्यामुळे परीक्षकांनी बक्षीस रद्द केले.

**सर्वोत्कृष्ट संगीत (रोख रु. २५०/- + प्रशस्तीपत्रक)**
योग्य स्पर्धक न आढळल्यामुळे परीक्षकांनी बक्षीस रद्द केले.

**सर्वोत्कृष्ट भित्तीचित्र (रोख रु. २५०/- प्रशस्तीपत्रक )**
अपुऱ्या प्रतिसादामुळे परीक्षकांनी बक्षीस रद्द केले.

**अंतिम फेरीतील सहभागाबद्दल (प्रशस्तीपत्रक + स्मृतीचिन्ह)**
भारत पेट्रोलियम स्पोर्टस क्लब - इंप्रोवायझेशन
क्षितिज किर्ती महाविद्यालय - द बर्म्युडा कॉल
स्वच्छंद मुंबई - काही असे काही तसे

**याबरोबरच प्राथमिक फेरीतील उत्तेजनार्थ - (प्रशस्तीपत्रक+रोख रु. २०१/-)**
**अभिनय :** १) प्रविणा त्रिभुवन २) मंदार गायधनी ३) रचना डांगळे
**लेखन :** १) मंदार गायधनी २) गणेश गभाले ३) अधटराव



# क्रीडा विभाग
## वार्षिक अहवाल १ एप्रिल २००२ ते ३१ मार्च २००३

## खो खो

अ) शिवनेरी क्रीडा मंडळ आयोजित मुंबई (शहर) जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा आणि शिवसम्राट क्रीडा मंडळ आयोजित जिल्हा स्तरी स्पर्धा या दोन्ही स्पर्धेत महिला संघाला उपविजयीपद.

ब) मुंबई (शहर) जिल्हा (ज्युनियर) अजिंक्यपद स्पर्धेत कुमार संघाला तृतीय क्रमांक प्राप्त झाला.

क) प्रतिनिधीक संघात निवड :-
श्वेता कांबळी : मुंबई (शहर) महिला संघ कर्णधार मुंबई विद्यापीठ संघ (उपकर्णधार)
शुभदा धुरी : मुंबई (शहर) महिला गट, फेडरेशन चषक स्पर्धेसाठी आणि राष्ट्रीय शालेय खो खो स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात.
विशाखा सुर्वे : मुंबई (शहर) महिला संघात
निलेश सावंत, अनिरुद्ध रेडकर } मुंबई (शहर) ज्युनियर संघात निवड परंतु राज्य अजिंक्यपद स्पर्धा झाली नाही.
अमेय गोडकर : मुंबई (शहर) सब ज्युनियर संघात

ड) वैयक्तिक पारितोषिके मानकरी : प्रीती धुरी, विशाखा सुर्वे, निलेश सावंत, प्रसाद कांबळी यांनी विविध स्पर्धांतून वैयक्तिक पारितोषिके मिळविली.

मंडळाच्या खोखो खेळाडू कु. प्रीती धुरी आणि कु. श्वेता कांबळी यांना मुलुंडच्या सुभद्राबाई शिक्षण समितीतर्फे यंदाही क्रीडा शिष्यवृत्ती मिळाली.

प) मार्च २००२ मध्ये झालेल्या जिल्हा स्तरीय खोखो पंच परीक्षेचा निकाल सप्टेंबर २००२ मध्ये जाहीर झाला व त्यात मंडळाचा खोखो खेळाडू निलेश सावंत याने ८७% गुण संपादन करुन सर्वप्रथम क्रमांक पटकावला. मंडळाच्या गणेश बोरकर याने ८०% गुण मिळवून उत्तम यश संपादन केले.

## कबड्डी :-

अ) **अमर हिंद मंडळाच्या महिला संघाने २० ते २६ जानेवारी या सप्ताहात झालेल्या १) दुर्गामाता क्रीडा मंडळ, शिवडी २) रामसेवक क्रीडा मंडळ, चिंचपोकळी आणि ३) सूर्यकांत क्रीडा मंडळ, परळ या तीन जिल्हा स्तरीय स्पर्धांची अजिंक्यपदे निर्विवादपणे पटकावून एक नाविन्यपूर्ण हॅटट्रिक संपादन केली.या तीनही स्पर्धांतून मंडळाच्या प्रत्येक खेळाडूंनी अप्रतिम खेळ केला. विशेषतः अलका पारकरने प्रत्येक स्पर्धेत वैयक्तिक अष्टपैलू पारितोषिक पटकावून एक आगळी वेगळी हॅटट्रिक केली. मंडळाच्या क्रीडा इतिहासातील ही एक सुवर्ण नोंद आहे.**

शिवनेरी क्रीडा मंडळ, विजय बजरंग क्री. मं. आणि कामगार क. क्री. केंद्र यांच्या स्थानिक स्पर्धांचे उपविजयीपद मंडळाच्या महिला संघाला मिळाले तसेच मुंबई शहर ज्युनियर गट अजिंक्यपद स्पर्धेचे उपविजयीपदही मिळाले.

ब) पुरुष "अ" श्रेणी : मागील वर्षात मंडळाच्या कबड्डी खेळाडू "ब" श्रेणी स्पर्धांतून भव्यदिव्य पराक्रम केल्यामुळे मंडळाच्या संघाला "अ" श्रेणी बढती मिळाली. तथापि या गटात प्रचंड स्पर्धक असल्यामुळे मंडळाचे खेळाडू फार मोठी मजल मारु शकले नाहीत. वीर बजरंग क्रीडा मंडळाच्या "अ" श्रेणीच्या स्पर्धेत मंडळाने उपविजयीपद संपादून आपल्या ताकदीची चुणूक दाखविली आहे.

क) प्रतिनिधीक संघात निवड :-

| | | |
|---|---|---|
| अलका पारकर | : | १) स्वामी समर्थ क्री. मं. प्रभादेवी आयोजित राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी (मुंबई शहर) संघाचे प्रतिनिधीत्व.<br>२) एस्. एन्. डी.टी विद्यापीठ संघात. |
| शारदा भोगले | : | मुंबई विद्यापीठ संघात |
| निशा आंबेकर | : | मुंबई शहर महिला संघात |
| संध्या तोडणकर | : | एस्. एन्.डी.टी. विद्यापीठ |
| साईनाथ काळसेकर | : | मुंबई ज्युनियर संघात |
| सोनाली इंदूलकर | : | मुंबई ज्युनियर संघात |
| शीतल आंब्रे | : | मुंबई ज्युनियर संघात |
| धनश्री पवार | : | मुंबई सब ज्युनियर संघात |
| युगंधरा पाटील | : | मुंबई सब ज्युनियर संघात |
| कुणाल यादव | : | राष्ट्रीय शालेय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात |
| प्रियांका झेंडे | : | राष्ट्रीय शालेय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात |



ड) वैयक्तिक पारितोषिके :-

मंडळाचे पुढील खेळाडू विविध स्पर्धांतून वैयक्तिक पारितोषिकांची मानकरी ठरले.

अलका पारकर, तृप्ती भाटकर, आरती नार्वेकर, प्रियांका झेंडे, संध्या तोडणकर, शारदा भोगले, कुणाल यादव, राहुल वंडेकर.

## ॲथलेटिक्स :

अ) निलेश सावंत (खोखो खेळाडू) :-

१) सांताक्रूझ येथील विल्लींगटन कॅथॉलिक जिमखान्याच्या प्रकाशझोत खुल्या ॲथलेटिक्स स्पर्धेत २०० व ८०० मिटर शर्यतीत अनुक्रमे कास्य व रौप्यपदक.

२) मुंबई जिल्हा स्तरीय आंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री (५००० मिटर) शर्यतीत (म.द. महाविद्यालय तर्फे सहभाग) कांस्यपदक.

म. द. महाविद्यालयाच्या अंतर्गत वार्षिक ॲथलेटिक्स स्पर्धेत २००, ८००, १५०० व ४ × १०० मिटर रीले अशा प्रत्येक शर्यतीत सुवर्ण पदक व कॉलेजचा सर्वोत्कृष्ट खेळाडूचा बहुमान.

ब) आरती नार्वेकर (कबड्डी खेळाडू) :-

१) महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा स्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेत ४×१०० मिटर शर्यतीत ज्युनियर व महिला गटात अनुक्रमे कांस्य व रौप्यपदक.

२) म.द.महाविद्यालयाच्या वार्षिक ॲथलेटिक्स स्पर्धेत गोळाफेक ८०० मिटर, ४×१०० मिटर रीले, शर्यतीत सुवर्ण पदक आणि उंचउडी व लांब उडी स्पर्धांत 'कांस्यपदक' कॉलेजची सर्वोत्कृष्ट खेळाडूचा बहुमान.

अहवालकाळात महिला कबड्डी संघाला ट्रॅकसूट व स्पोर्टस शुज देण्यात आले.

## दैनंदिन सराव

१) कबड्डी - मुल-मुली / श्री. विजय राणे

२) खोखो - मुली / श्री. प्रफुल्ल पाटील

मुल / श्री. रमेश नाटेकर / श्री. जतीन टाकळे

क्रीडाप्रमुख श्री. रमेश वरळीकर आवश्यक तेव्हा खोखोत मार्गदर्शन करतात. संबंधित प्रशिक्षक जेव्हा अनुपस्थित असतात तेव्हा संघातील जेष्ठ खेळाडू सरावाची जबाबदारी पार पाडतात.

# कबड्डी स्पर्धा संयोजन

८ ते १३ जानेवारी या कालावधीत मुंबई शहर जिल्हा कबड्डी संघटनेच्या मान्यतेने पुरुष "ब" श्रेणी गटाची जिल्हा स्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन आपल्या मंडळातर्फे यशस्वीपणे पार पडले.

३२ संघाचा सहभाग लाभलेल्या या स्पर्धेला प्रसिद्धी आणि प्रेक्षकांचा सहभाग उत्तमपणे लाभला. कबड्डी जाणकार आणि रसिकांची उत्तम प्रतिक्रिया यामुळे श्रमाचे चीज झाल्याचे समाधान मिळाले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी कबड्डी खेळाडूंनी खुप मेहनत घेतली. त्यांना खो-खो खेळाडूंचीही छान साथा मिळाली. या कबड्डी स्पर्धा संयोजनातून एक कार्यक्षम युवाशक्ती निर्माण झाली आहे.

या संयोजनाला इतर खेळातील नामवंत खेळाडू आणि कार्यकर्ते तसेच समाजातील इतर प्रतिष्ठीतांनी भेट द्यावी म्हणून त्यांना खास निमंत्रण पत्र पाठविली होती. अशा अनेकांनी प्रत्यक्ष भेट देऊन समाधान व्यक्त केले.

या स्पर्धेच्या निमित्ताने ज्येष्ठ क्रीडा पत्रकार श्री. वसंत भालेकर, कबड्डीचे 'दादोजी कोंडदेव' पुरस्कार मानकरी श्री. भाई कालुष्टे आणि कबड्डीच्या राष्ट्रीय कीर्तीच्या खेळाडू सौ. लीला कोरगांवकर यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

या स्पर्धेच्या निमित्ताने एक छोटीशी पण आकर्षक स्मरणिक समारोपाच्या दिवशी समारंभाचे अध्यक्ष श्री. मोरेश्वर गर्दे (जनरल मॅनेजर, न्यु इंडिया अॅशुरन्स कं. लि.) यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आली. स्मरणिकेच जाणकारांच्या लिखाणासह मंडळाच्या क्रीडा विभागाच्या ताज्या पराक्रमांची छायाचित्रासंह एक झलक समाविष्ट करण्यात आली आहे. या स्मरणिकेतील जाहिरातीमार्फत तसेच बॅनर मार्फत मोठा आर्थिक लाभ झाला.

उदघाटन समारंभ मुंबईच्या माजी महापौर आणि विद्यमान आमदार सौ. विशाखा राऊत यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. बँकेचे अध्यक्ष श्री. पांडुरंग शानभाग आणि कबड्डी, खो-खो व फुटबॉलचे राष्ट्रीय खेळाडू श्री. रघुनाथ नलावडे यांना खास आमंत्रित केले होते.

पारितोषिक वितरण समारंभाचे अध्यक्ष श्री. मोरेश्वर गर्दे आणि कबड्डीच्या अर्जुन पुरस्कार मानकरी, सौ. माया (आक्रे) मेहेर यांच्या हस्ते पार पडला. या जिल्हा



स्तरीय स्पर्धेच्या पारितोषिकांबाबत कबड्डीतील जाणकार आणि रसिकांनी कौतुक करुन समाधानाची पावती दिली. या संदर्भात मंडळाचे विश्वस्त श्री. दिनकर पाटील, कार्यकारी मंडळाचे सदस्य श्री. चारुदत्त धरवल आणि हितचिंतक श्री. सुरेश परब (आवास बिल्डर्स) आणि एव्हरशाईन बिल्डर्स यांनी मोठा आर्थिक भार उचल्यामुळे पारितोषिकांच्या आकर्षणात भर पडली. त्याचप्रमाणे श्री. अशोक बिर्जे, श्री. नाथमल मनरुपजी, श्री. सिताराम नारकर, श्री. सिद्धार्थ देसाई, श्री. विनायक सातोस्कर, स्वामी समर्थ मेडिकल अँड जनरल स्टोअर्स, विकी केटरर्स व श्री. स्वामी समर्थ डेकोरेटर्स यांचेही उत्तम सहकार्य लाभले.

# स्पर्धेचे निर्णय

| | |
|---|---|
| अंतिम विजयी | अमर क्रीडा मंडळ, दादर |
| अंतिम उपविजयी | गणेश कृपा मंडळ, प्रभादेवी |
| उपांत्य उपविजयी | साऊथ कॅनरा वरळी, |
| | अमर क्रीडा मंडळ, वरळी |
| सर्वोत्कृष्ट अष्टपैलु | महेश जोशी (अमर क्री मं. दादर) |
| सर्वोत्कृष्ट पकडीचा | प्रशांत कदम (अमर क्री. म. दादर) |
| सर्वोत्कृष्ट चढाईचा | अभिषेक मिठभावकर (गणेश कृपा. मं.) |
| शिस्तबद्ध संघ | नरसिंह क्रीडा मंडळ |
| दिवसाचे मानकरी | सुशांत शिर्के (नवोदित संघ) |
| | शैलेश खांडेकर (महाराष्ट्र स्पो.क्लब.) |
| | रामसिंग (विकास क्रीडा मंडळ) |
| | अनंत हेगडे (यंग उमरखाडी) |
| | उमेश गावडे (अमर क्रीडा मंडळ, वरळी) |

## कार्यकारी समितीच्या सभा उपस्थितीची माहिती
## (परिशिष्ट १)

| | २००१-०२ | २००२-०३ |
|---|---|---|
| १) श्री. चिंतामणी वि. नागले (कार्याध्यक्ष) | १० | ७ |
| २) श्री. अरुण अ. देशपांडे (कार्योपाध्यक्ष) | १० | ७ |
| ३) श्री. उमेश व्यं. शेणॉय (कार्यवाह) | ९ | ६ |
| ४) श्री. सतीश श. रेडीज (सं. कार्यवाह) | ७ | ६ |
| ५) श्री. श्रीकृष्ण शं. राणे (कोषाध्यक्ष) | १० | ६ |
| ६) श्री. दीपक ना. पडते (सदस्य) | ४ | ३ |
| ७) श्री. भास्कर भिवा केरकर (सदस्य) | ८ | ६ |
| ८) श्री. चारुदत्त शां. थरवल (सदस्य) | ६ | ५ |
| ९) श्री. दत्ता अ. सावंत (सदस्य) | ७ | ७ |
| १०) श्री. संजय वि. पेडणेकर (सदस्य) | ७ | ४ |
| ११) डॉ. स्नेहल मं. बिर्जे (सदस्य) | ६ | ५ |
| १२) श्री. प्रफुल्ल दा. पाटील (सदस्य) | ९ | ५ |
| १३) श्री. विजय प्र. राणे (सदस्य) | ८ | ७ |
| १४) सौ. विद्या वि. अडसूळे (सदस्य) | १ | ० |



परिशिष्ट (२)

## वसंत व्याख्यानमाला (वर्ष ५४ वे)

**कार्यक्रम पत्रिका**

शनिवार दि. २१-४-२००१
उदघाटक - सन्माननीय प्रा. ना. स. फरांदे, सभापती, महाराष्ट्र विधान परिषद
विषय : शिक्षक्षेत्रातील वाढती मूल्यहीनता

रविवार : दि. २२-४-२००१
वक्ते - डॉ. जगदीश मुरलीधर उपासनी (M.B.B.S. M.D.)
Consulting Physician & Cardiologist
विषय : अध्यात्म आणि विज्ञान

सोमवार : दि. २३-४-२००१
वक्ते - मा. श्री. मिलिन्द गाडगीळ (ज्येष्ठ पत्रकार, युद्धशास्त्रज्ञ आणि अर्थशास्त्रज्ञ)
विषय - शस्त्र खरेदीतील "तेहेलका"

मंगळवार : दि. २४-४-२००१
वक्ते - श्रीमती निर्मला जोगळेकर
विषय : लाहोरच्या आठवणी

बुधवार : दि. २५-४-२००१
वक्ते - श्रीमती नीला पद्माकर देसाई (B.A.) (शिवसेनेच्या पहिल्या महिला आमदार)
विषय : "राजकारणात महिलांचा सहभाग"

गुरुवार : दि. २६-४-२००१
वक्ते - सुप्रसिद्ध मनोविकार तज्ञ डॉ. राजेंद्र बर्वे (M.D. D.P.M.)
विषय - "मानसिक ताण-तणाव आणि आपण"

शुक्रवार : दि. २७-४-२००१
वक्ते - डॉ. सुबोध वागळे (B. Tech. Ph.D)
विषय - महाराष्ट्रातील वीजक्षेत्र : समस्या आणि आणि लोकशाहीकरणाचा उपाय"

शनिवार : दि. २८-४-२००१
वक्ते - मा. श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी (मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती)
विषय - "शक्ती देवामध्ये आहे की सैतानात"

[illegible]वार : दि. २९-४-२००१
वक्ते - प्रा. प्रवीण दवणे (सुप्रसिद्ध गीतकार, कवी)
विषय - "दिलखुलास" एक हृदय संवाद

सोमवार : दि. ३०-४-२००१
ख्यातनाम ज्येष्ठ आणि श्रेष्ठ संगीतकार सन्माननीय श्री. श्रीनिवास खळे यांचा अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार व मुलाखत
प्रमुख पाहुणे : कविवर्य मंगेश पाडगांवकर मुलाखत - मा. श्री. सौ. उत्तरा मोने
सोबत मा. श्री. निवास खळे यांनी स्वरबद्ध केलेल्या गाण्यांचा कार्यक्रम

परिशिष्ट - ३

## वसंत व्याख्यानमाला (वर्ष ५५ वे)

कार्यक्रम पत्रिका

रविवार दि. २१-४-२००२
उदघाटक - सन्माननीय श्री. उल्हासदादा पवार,
अध्यक्ष उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळ
विषय : आजची राजकीय व सामाजिक स्थिती व वाढता धर्माधवाद

सोमवार : दि. २२-४-२००२
वक्ते - श्री. मधुसूदन ताम्हणे
विषय : कथा सावरकर चित्रपट निर्मितीची

मंगळवार : दि. २३-४-२००२
वक्ते - श्रीमती रझिया पटेल
विषय - भारतीय राष्ट्रवादाचा आधार, धर्मनिरपेक्षता

बुधवार : दि. २४-४-२००२
वक्ते - प्रा. श्री. अशोक बागवे
विषय : पसायदान कालचे आणि आजचे

गुरुवार : दि. २५-४-२००२
वक्ते - डॉ. अरुणा कौलगुड
विषय : यशस्वी व्यक्तिमत्वाचे सादरीकरण

शुक्रवार : दि. २६-४-२००२
वक्ते - प्रा. श्री. मोहन आपटे
विषय - एकविसाव्या शतकातील विज्ञान

शनिवार : दि. २७-४-२००२
वक्ते - डॉ. जयंत करंदीकर
विषय - आवाज साधना आणि ओमकार उपासना

रविवार : दि. २८-४-२००२
महाराष्ट्रातील सर्व मान्यवर कविवर्य मंडळाच्या व्यासपीठावर उपस्थित राहणार असून सादर करीत आहेत लोकप्रिय कार्यक्रम "**हास्यधारा**" महाराष्ट्रातील प्रख्यात हास्यकवीकडून त्यांच्या काव्यांचे सादरीकरण श्री. रामदास फुटामे मा. श्री. फु. म. शिंदे आणि मा. श्री. अशोक नायगांवकर आणि हास्यधाराचे सर्व मान्यवर कविवर्य.
मंडळाचे हिचचिंतक सन्माननीय श्री. उदयदादा लाड यांच्या सौजन्याने हास्यधाराचा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.



(परिशिष्ट -४)

## ३१ मार्च २००२ अखेरच्या मुदत-ठेवींची विगतवारी

| | परिशिष्ट<br>रुपये पैसे |
|---|---|
| अभ्युदय को. ऑप. बँक लि. | २,४५,४५०.०० |
| [illegible]रस्वत को. ऑप. बँक लि. | ३,७८,५५५.०० |
| दि. कॉसमॉस को. ऑप. बँक | १,७२,१२९.०० |
| दि. नॉर्थ कॅनरा जी. एस. बी. बँक लि. | ३,८४,३७३.०० |
| स्टेट बँक ऑफ इंडिया | १,२३,६९१.०० |
| बँक ऑफ महाराष्ट्र | ३,०९,४५३.०० |
| युनायटेड वेस्टर्न बँक | १,२६,०८८.०० |
| युनियन बँक ऑफ इंडिया | २७,३५,४०८.०० |
| युको बँक | २,९९,२४८.०० |
| [illegible]ण | ४७,७४,३९५.०० |

## (परिशिष्ट -५)

## ३१ मार्च २००३ अखेरच्या

## मुदत-ठेवींची विगतवारी

| | परिशिष्ट<br>रुपये पैसे |
|---|---|
| अभ्युदय को. ऑप. बँक लि. | २,५४,३५८.०० |
| सारस्वत को. ऑप. बँक लि. | ४,०४,३१५.०० |
| दि. कॉसमॉस को. ऑप. बँक | १,७३,९४८.०० |
| दि. नॉर्थ कॅनरा जी. एस. बी. बँक लि. | ३,९९,६०६.०० |
| बँक ऑफ इंडिया | ४,०२,२४५.०० |
| बँक ऑफ महाराष्ट्र | ३,३१,३१६.०० |
| युनायटेड वेस्टर्न बँक | १,३४,९९९.०० |
| युनियन बँक ऑफ इंडिया | २८,२०,२९५.०० |
| युको बँक | ४,८१,०६६.०० |
| एकूण | ५४,०२,१४८.०० |